IMPACT FACTOR 5.473 (SJIF)
UPA NATIONAL E-JOURNAL
Interdisciplinary Peer-Reviewed Indexed E-Journal
ISSN 2455-4375

# वास्तववादी, निर्भीड, लढवय्यी कविता :' ती कविता आणि चळवळ'

**डॉ .प्रतिभा सुरेश जाधव**
सहाय्यक प्राध्यापक
कला ,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय ,
लासलगाव , ता .निफाड ,जि.नाशिक ४२२३०६
९६५७१३१७१९
pratibhajadhav279@gmail.com

साठोत्तरी साहित्य प्रवाहात दलित आत्मकथन व कवितेतून परिघाबाहेरील दबलेला ,पिचलेला नवशिक्षित समाज प्रारंभी मोठ्या प्रमाणात बोलू लागला .पारंपारिक मराठी साहित्याचे सौंदर्यशास्त्र दलित संहित्याने नाकारले .आपली संवेदना ,जाणिवा. अभिव्यक्ती यांना आपल्या शैलीत तो टोकदारपणे मुखर करू लागला .प्रारंभी यात स्त्रियांचे प्रमाण कमी होते परंतु कालांतराने स्त्रीयाही आपला भोगवटा लिहू लागल्या ,इथल्या पुरुषप्रधान संस्कृतीस ,विषमतावादी वर्णव्यवस्थेस जाब विचारू लागल्या .डॉ .सुनील चंदनशीवे म्हणतात त्याप्रमाणे‘ ,प्रस्थापित मराठी भाषेचे जूने बंध व विचार तिने दूर लोटून वास्तववादी सुर या कवितेतून आलेला आहे .गुळगुळीत अशा मराठी काव्य वाङ,मयाला एक तरतरीत नवा चेहरा देण्याचे काम दलित कवितेने केलेले आहे .

आशयघनता व अभिव्यक्तीचे अनोखे रूप दलित कवितेने देऊन आपले एक वेगळे विश्व निर्माण केले ’. दलित कवितेच्या निर्मितीची प्रेरणा व सामाजिक पार्श्वभूमीचा विचार केला तर प्रथम दलित साहित्याची संकल्पना समजावून घेणे गरजेचे वाटते .दलित साहित्य हे दलित समाजाचे आणि त्यांच्या जीवनाचे अभिदर्शन आहे . साहित्य हे जीवनदर्शन असते हे मान्य केल्यामुळे मराठी जीवनाचे दर्शन नव्याने उलगडण्यात येते तेव्हा मूळ अनुषंगाने, सूत्रांच्या रूपाने दलित साहित्याची परिभाषा संकल्पना ठरवावी लागते .ती मांडणीसुद्धा आवश्यक ठरते .दलित साहित्याविषयी अनेक मान्यवरांनी व्याख्या केलेली आहे .त्यात डॉ.म.ना .वानखेडे म्हणतात की, "दलित साहित्य हे दलित लेखकांनी दलितांविषयी निर्माण केलेले प्रक्षोभक विद्रोही साहित्य आहे”. तर बाबुराव बागुल म्हणतात की, "माणसाच्या मुक्तीचा पुरस्कार करणारे, माणसाला महान मानणारे वंश-वर्ण-जाती श्रेष्ठत्वाचा कठोर विरोध करणारे साहित्य ते दलित साहित्य होय ”. केशव मेश्राम म्हणतात की, “हजारो वर्ष ज्यांच्यावर अन्याय झाला, अशा अस्पृश्यांना दलित म्हटले व त्या वर्गातील लेखकांनी निर्माण केलेले साहित्य म्हणजे दलित साहित्य होय ”.राजा ढाले म्हणतात की, “जो या समाजरचनेविरुद्ध आणि सांस्कृतिक व्यवहार रचनेविरुध्द लढण्याचा दृष्टीकोन घेऊन साहित्याची निर्मिती करेल आणि वाट चुकलेल्या समाजाला वाटेवर आणेल तो दलित साहित्यिक असेल .त्याचे साहित्य म्हणजे दलित साहित्य होय ”. अशाप्रकारे अनेक मान्यवरांनी दलित साहित्याच्या व्याख्या केलेल्या आहेत .ह्या तत्वांशी बांधिलकी असणाऱ्या दलित साहित्यात अनेक नामवंत कवयित्री होऊन गेल्या व आजही लिहीत आहेत. त्यातील एक नाव म्हणजे बुलडाणा येथील डॉ. विजयालक्ष्मी

वानखेडे होय. यांनी सुद्धा दलित कवितेचा आवाज बुलंद केलेला आहे. आपल्या कवितेतून त्यांनी दलित जाणिवेची आणि एकंदर परिघाबाहेरील माणसाची भावना मुखर केलेली आहे.

आजच्या दलित साहित्यिकांना कविता आणि राजकीय कृती या अभिनव गोष्टी वाटतात . कविता ही त्यांच्या दृष्टीने सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनासाठी चाललेल्या संघर्षातील वर्गीय हत्यार आहे. भूमिका विशद करणारे आणि कविता लिहिणारी व्यक्तीमन एका माणसाचे असले तरी ते एकच नसते एकाच पातळीवर वावरत नसते. नामदेव ढसाळ आणि यशवंत मनोहर यांची कविता व साहित्यविषयक भूमिका वाचताना या गोष्टीचा सहज प्रत्यय येतो . ढसाळांच्या ' गोलपिठा'मधील अखेरच्या कविता नंतरच्या पुढील कविता याला अपवाद आहेत . लिहिण्यापूर्वी लेखनाचे कितीही हेतू मनात घोळवले तरी प्रत्यक्ष कविता लेखनात हे शून्य आहे. विविध दृष्टींनी या कवितेचा विचार झाला पाहिजे, त्यांच्या आधारे या कवितेचा कस राखला गेला पाहिजे. तिचे सामर्थ्य आणि तिच्या मर्यादा याबाबतच्या आपल्या जाणिवा प्रकट केल्या पाहिजे.

दलित कविता ही संज्ञा आपण दलित कवींची कविता या अर्थाने वापरत आहोत. कविता ही दलित नसते, ती कविता असते. ती बरी कविता असते किंवा वाईट असते. दलित कवी हा कविता लिहिणारे जे कोणी आहेत त्यांचा एक वेगळा वर्ग असला, कवी दलित म्हटला तरी तो सर्वप्रथम कवी असला पाहिजे. त्याशिवाय त्याचे लेखन, कविता या नावाने ओळखले जाणाऱ्या साहित्यप्रकारात बसणार नाही . त्याच्याठायी कवितेसाठी आवश्यक त्या शक्ती असायला हव्यात. म्हणजे कवीची संवेदनशीलता आणि प्रतिभा त्याच्या ठायी असल्याशिवाय कविता या साहित्यप्रकारात अनुस्यूत असलेल्या किमान अटी तो पुऱ्या करू शकणार नाही. त्यानंतर त्याचे दलित असणे यासाठी महत्त्वाचे की, त्यामुळे त्याच्या संवेदनशीलतेला एक विशिष्ट रूप लाभत असते. हाच वसा व वारसा पुढे घेऊन जाणाऱ्या कवयित्री म्हणजे डॉ .विजयालक्ष्मी वानखेडे होत . असं खुप कमी वेळा होत असेल की एखादा काव्यसंग्रह, त्यातील कविता दीर्घकाळ मनमेंदूत रुंजी घालताहेत .शब्द-शब्द वाचताना काया रोमांचित व्हावी .थेट काळजाशी संवाद साधणारी कविता भेटते तेव्हा अशी अनुभूती येते. 'ती, कविता आणि चळवळ' या काव्यसंग्रहातील डॉ.विजयालक्ष्मी वानखेडे यांची कविता वाचताना अगदी हेच अनुभवलं. त्यांच्या प्रत्येक कवितेतून त्या स्वतः प्रत्यक्ष भेटताय, बोलताय असे वाटत राहाते ,इतकी संवादी जीवंत आणि वास्तव सभोवताल रेखाटणारी डॉ .विजयालक्ष्मी यांची कविता आहे .त्यांची कविता ही त्यांचे स्वतःचे जगणे तर आहेच पण एका मोठ्या समूहाचा तो उत्कट हुंकारदेखील आहे .इथली जातव्यवस्था, जातजाणिवा, जातवास्तव आणि त्यातून जन्मास आलेल्या वेदना-संवेदना म्हणजे डॉ.विजयालक्ष्मी वानखेडे यांची कविता होय.

डॉ. विजयालक्ष्मी वानखेडे हे तसे साहित्यक्षेत्रातील एक मोठे नाव . बुलढाण्यातील छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था, मोताळा या विद्यालयाच्या त्या प्राचार्य आहेत .अत्यंत संवेदनशील, विवेकी व प्रयोगशील शिक्षिका त्या आहेत .आई-वडिलांनी उभारलेली शैक्षणिक संस्था अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी सांभाळली, मोठी केली. आपल्या धडाडीच्या कामामुळे संस्थेस एक वेगळाच नावलौकिक मिळवून दिला. शेवटच्या स्तरातील कुटुंबात शाळेविना कुणीही मूल राहू नये म्हणून मुळात कार्यकर्ती असणारी ही हाडाची शिक्षिका पायपीट करीत तळमळीने मुलांना शाळेपर्यंत आणते .निराश न होता परिस्थितीशी लढत राहते आणि एक दिवस त्या कष्टांना फळं, फुलं लगडतात, शाळेत मुलंच मुलं बागडतात .ग्रामीण भागातील शाळा असूनही सर्व

अद्ययावत सुविधा विद्यार्थ्यांना देता याव्यात म्हणून आपल्या जोडीदाराच्या,मुलांच्या,सहकाऱ्यांच्या भक्कम साथीने ही लढवय्यी लढत राहते आणि यशस्वीदेखील होते.

साहित्यक्षेत्र असो, शैक्षणिक क्षेत्र असो वा सामाजिक क्षेत्र डॉ. विजयालक्ष्मी वानखेडे हे नाव महाराष्ट्राभर ज्ञात असणारे नाव आहे . माणसाचे काम त्याला नाव आणि प्रसिद्धी देत असते .त्याचा स्वभावही त्याला माणसांशी जोडत असतो,सांधत असतो .माणूस जोडणाऱ्या आणि आपल्या अभ्यासपूर्ण ,ओघवत्या संवाद शैलीने त्या समोरच्याला आपलेसं करतात हा माझा व माझ्यासारख्यांचा स्वानुभव आहे.

डॉ. विजयालक्ष्मी वानखेडे ह्या खरे तर एका विचारवंताच्या भूमिकेतून सभोवताल बघतात .हळव्या करणाऱ्या वेदना नेमकेपणाने मांडतात . सांप्रत स्थितीचा उत्तम असा अभ्यास त्यांचा आहे त्यामुळे तसे नेमके संदर्भही त्यांच्या कवितेतून येत राहतात .'ती ,कविता आणि चळवळ' हा परिवर्तन पब्लिकेशन, बुलडाणा यांनी 2016 साली प्रकाशित केलेला काव्यसंग्रह. हा त्यांचा पाचवा काव्यसंग्रह आहे .एकूण ६६ कविता या काव्यसंग्रहात आहेत .या काव्यसंग्रहात स्त्रीवादी व परिवर्तनवादी कविता अधिक आहेत .कवितेतून बाईपणाची व्यथा त्या जरी मांडत असल्या तरी त्यातून आशावादी सकारात्मकता स्पष्ट दिसते .मुळात चळवळीतील क्रियाशील कार्यकर्तीचा पिंड असणाऱ्या डॉ. विजयालक्ष्मी वानखेडे यांची कविता ही लढाऊ बाण्याची आहे.

स्त्रीबद्दल त्या आपल्या 'ती' या कवितेत 'ती'ची अनेक रूपं मांडतात .त्यासाठी अल्लड, अवखळ , अवघड, हळूवार, दरवळ, परिमळ, सळसळ, पानगळ अशा विविध उपमा-रुपकं त्या योजतात . याच कवितेतील शेवटच्या ओळी अत्यंत प्रभावी आहेत त्या अशा-

'कार्यकर्त्याच्या काळजातली
कळ असते ती
सामाजिक परिवर्तनाची
चळवळ असते ती' (पृ .८)

'नित्यनेम' या कवितेत त्या मोलकरणीच्या रुपात इथली स्त्रीची चिरंतन वेदना मांडतात जी अंतर्मुख करून जाते . 'ताळमेळ'(पृ.१०) कविता तर प्रत्येक नोकरदार महिलेची स्थिती अगदी सही सही रेखाटणारी कविता आहे .माझ्या 'वेदनेचा प्रदेश' या कवितेची आठवण इथे मला प्रकर्षाने झाली. लहान बाळ, स्वयंपाक, दारावर अचानक आलेला अतिथी, कामावर निघण्याची झालेली वेळ आणि समोर पडलेला कामांचा पसारा यात पुरती थकलेली 'ती' ही बाईची कसरत अगदी सार्थ शब्दात त्यांनी मांडली आहे .कुणाही महिलेला वाचताना ती स्वतःचीच व्यथा वाटावी एवढी ही वास्तव कविता आहे.

'दोन शब्द' (पृ.१३) ही कविता कमी शब्दात खूप मोठा आशय व्यक्त करणारी सूचक कविता आहे .या कवितेत कवयित्री म्हणते की ,

'दोन शब्द 'आई मला वाढून दे'
दोन शब्द 'वैनी तेवढा शर्ट इस्त्री कर ना'
दोन शब्द 'बाईसाहेब, भंगार-रद्दी काढलीत का?
दोन शब्द 'नोकरी करायची तर फालतू सबबी नको'
'अगं ए, मित्रांना बोलावलंय आज जेवायला'

त्या दोन शब्दांची 'अगं किती करतेस? जरा स्वतःसाठी वेळ दे' (पृ.१३)

खरेच आहे 'ते दोन शब्द' ऐकण्यास फार आतुर असते ती पण तिची काळजी करणारे ते शब्द किती जणींच्या वाट्याला येतात? खरे तर ती केवळ शब्दांची भुकेली असते ,तिच्या कष्टाची कुणीतरी दखल घेतंय हेच तिच्यासाठी खूप काही असतं .तिची आत्मीयतेने विचारपूस केली तरी ती सुखावते आणि दुप्पट वेगाने काम करते फक्त ते दोन शब्द कुणी तिच्यासाठी उच्चारत नाही .ती जे काही घरासाठी करते ते तिचं कर्तव्यच आहे या भावनेने सतत तिला गृहीत धरलं जातं हे चित्र घराघरात दिसत, त्यामुळे बाईची ही वेदनादेखील घराघरात आहेच . 'लाचार' या कवितेत प्रसवकळा येऊन व्याकुळ झालेली अन भररस्त्यात उधळणाऱ्या बैलगाडीचे हादरे सोसत कासावीस होणारी 'आई' अत्यंत हळवं करणाऱ्या शब्दात-लयीत त्यांनी व्यक्त केली आहे. या काळीज कापीत जाणाऱ्या कवितेत शेवटी कवयित्री म्हणते,

'बरं झालं, सुटलीस माय
किती सोसलंस जीवावर
उसवलेल्या मनात माह्या
गोठ्यातली म्हैस, दारची कुत्री आणि घरातली लाचार मांजर..'(पृ.१९)

दाराबाहेरील 'वेडीवर' होणारा अत्याचार कवयित्रीची रात्रही अस्वस्थतेने काळीनिळी करून जातो .हत्या करून फास दिलेल्या आणि आत्महत्या केल्याचा आरोप लावणाऱ्या तिचा सराईत खुनी कसा शोधायचा? हा प्रश्न ती समाजास, वाचकास विचारते. चौकट भेदणारा , विचारप्रवृत्त करणारा आशय कवयित्री मांडते याचे ठळक उदा . म्हणजे 'न्यून' ही नऊ ओळींची कविता होय .साधारण मनातही न येणारे प्रश्न सहजी कवयित्रीस पडतात . अर्थात त्यामागे तिची चिंतनशील वैचारिक बैठक आहेच .ही कविता अशी आहे की,

'न्यूनगंड असतो म्हणे
मुलींच्या मनात
शिश्नमत्सर असतो म्हणे त्यांच्यात दडलेला
पण शिश्नमत्सरच
का म्हणाला फ्राईड?
का नाही म्हणाला
गर्भशया अभावी निकामी
आणि न्यूनात असतात पुरुष?(पृ.२३)

घरच्या तान्हुल्याकडे सारं चित्त असणाऱ्या मोळीवालीची हृदयस्पर्शी व्यथा त्या मांडतात .एक मादी म्हणून तिच्याकडे पाहणारे , अचकट-विचकट खुणा करणारे पण तिच्या उरातला तिच्या बाळासाठी पाझरणारा पान्हा कुणाला दिसत नाही . सायंकाळ होईपर्यंत ती अनवाणी चालत राहते पण पोटातला आगडोंब विझवण्यासाठी दमडीही तिला मिळत नाही .वासनांध माणसं मात्र मोळीपेक्षा तिचाच दर विचारू लागतात हे इथली पुरुषी गलिच्छ प्रवृत्ती आहे.

उत्तम सामाजिक जाणिवा असलेली कवयित्री जे कवितेतून मांडते ते कुठेही एकांगी वाटत नाही .कारण ती जे या कवितांतून मांडते ते वास्तवाधिष्ठित आहे .त्यात कल्पनिकतेचा,कृत्रिमतेचा कुठेही लवलेश नाही. 'घोटभर

पाण्यासाठी' (पृ.१६) या कवितेतून कवयित्री पाण्याचे मोल मांडते .दहा शब्दांची 'जीवन' ही कविता मार्मिक सुचकतेचा उत्तम नमुना आहे .कवयित्रीची लेखनातली प्रयोगशीलता आणि प्रचलीत रूढींना आव्हान देण्याची वैशिष्ट्ये या कवितांमधून ठसठशीतपणे जाणवतात. 'बाहुली, पोरी बंड कर, बाई, लढा, डंख येऊ नकोस, माणूस' या कविता त्याचं उत्तम उदाहरण आहेत.

स्त्रीपुरूष समतेची बीजे या मातीत अजून रुजली नाहीत आणि विषमतेला मूठमातीही दिलेली नाही . लढणारी, कर्तबगार बाई समाजाला रुचली नाही आणि पचलीही नाही .तिचे कर्तृत्व, सामर्थ्य पेलणे त्याच्या क्षमतेबाहेरचं आहे खरं तर . तिला वाव दिला तर ती अंगभूत क्षमतांनी फार पुढे निघून जाईल आणि आपण मागे पडू हे भय पुरुषाच्या मनात चिरंतन आहे, काही अपवाद असूही शकतात पण नगण्य .सतत तिच्या कर्तृत्वास नाकारणाऱ्या व तिला हीन लेखणाऱ्या पुरुषप्रधान मानसिकतेला सणसणीत अशी चपराक कवयित्री हाणते . बाईच्या यशाचा वारू रोखणे शक्य नसेल तर तिचे चारित्र्यहनन करण्याचा दुष्ट कट रचला जातो हे गलिच्छ, निंदनीय वास्तव आहे .त्यामुळे मानसिक खच्चीकरण करून बाईला विशिष्ट क्षेत्रातून संपवण्याचा डाव असतो .तो न जुमानणारी कवयित्री आपल्या 'शस्त्र' या कवितेत लिहिते की,

'आता ती झुगारते
तुमचे चारित्र्य हननाचे शस्त्र
तेव्हा दुसरे शस्त्र परजून ठेवा
किंवा मग तिची शक्ती मान्य करून
हातात हात घालून चालू लागा'(पृ.३३)

इथे कवयित्रीस समानता अपेक्षित आहे.
हाच समानतेचा व स्वावलंबनाचा धागा पकडून आपल्या आपल्या 'येऊ नकोस' या कवितेत ती लिहिते की,

'यायचेच असेल तर ये
सोबत, सांगाती,सहप्रवासी म्हणुन
आता मी शिकले आहे सावरायला
आणि जुनी प्रतिमा विसरायला'(पृ.३५)
'स्वातंत्र्य' या कवितेत बाईचे पारतंत्र्य
'तुझा स्वातंत्र्यदिन यायला
अजून बराच वेळ आहे'(पृ.८२)

या शब्दात मांडतात . लिहिणं, बोलणं, मांडणं, व्यक्त होणं ह्या बाबी कवयित्रीच्या जगण्याचे अविभाज्य भाग आहेत . तंत्रज्ञानाच्या आभासी जगातही डायरी आणि पेन 'त्याच्या'कडून भेट म्हणून अपेक्षिणारी कवयित्री ही स्त्रीच्या पारंपरिक अपेक्षांनाही छेद देते .बाईच्या स्त्रीसुलभ अपेक्षा साड्या,दागिने यांच्याही पलीकडे गेलेली कवयित्री जोडीदारास म्हणते की,

'भावनाही आता शोकेसमध्ये
सजावट करून मांडल्या जातात
फेसबुकच्या स्टेट्सवर
लाईक आणि कंमेंट्स येतात
त्यात मी असते का सांग?
असले तरी
तुला दिसते का सांग?
किंवा मग एक कर
नात्यात नव्याने प्राण भर
फार काही नकोस देऊ
एक डायरी, एक पेन
फक्त माझ्या नावे कर'(पृ.३९)

यात 'वाचा' आणि 'रंग' या दोन्ही कविता प्रेमालाप करणाऱ्या आहेत त्यात हळुवार भावना कवयित्रीने मांडल्या आहेत . आपल्या 'अंतर' या कवितेतून कवयित्री तंत्रज्ञानामुळे संवेदना बोथट होत माणसा -माणसातील संवाद संपल्याची खंत व्यक्त करताना लिहिते की,

'खूप जवळ आलंय म्हणे जग
खरं आहे ,पण
माणुसकी,आपलेपणा
भावनांतील जीवंतपणा
दूरवर भिरकावला तर नाही ना
भौतिक अंतर कमी करताना?
असं ग्लोबलायझेशन होताना?' (पृ.४०)

'नाती'या संवादाशिवाय कालानुरूप कशी तुटत गेली हेच पुन्हा आपल्या 'ऋतु' या कवितेत कवयित्री लिहिते-

'तेच आहेत रस्ते
तिच आहे माती
तिच माणसं आहेत
तिच नातीगोती
मी ही तिच, तू ही तोच

तार कुण्या नात्याची झंकारत नाही
इतकंच...' (पृ.४२)

ही वेदना प्रत्येकाचीच सद्यस्थितीत दिसते.
काहीशा थंडावलेल्या चळवळीसाठी, कार्यकर्त्यांसाठी चिंतीत होणारी कवयित्री

'थंड झाल्या कशा हालचाली
पेटवाना पुन्हा त्या मशाली
षढ झाली कशी राजनीती
भारताला लूट ती दलाली
भोगती ते सत्तेला सुखाने
लोकशाहीत कर तू हमाली'(पृ.४७)

या शब्दात कार्यकर्त्यांत चेतना भरते .'जाग' या कवितेतून प्रभावी ,प्रेरक शब्द पेरताना सत्तेसाठी बांधिलकीचा, समतेचा विचार विसरणाऱ्या, स्वतःच्याच समाजाची फसवणूक करणाऱ्या बेईमानी पुढाऱ्याना सणसणीत चपराक देताना कवयित्री लिहिते की,

'तूच आहे रे भीमाच्या संगराचा चेहरा
बोटचेप्या धोरणाचा येऊ दे ना राग तू
भेदनीती पाळणारे ते तुझे का सोबती
सूर्य होता बा तुझा तो त्याप्रमाणे वाग तू
भाकरीला मागणारी फाटकी नाती तुझी
बांधवांचे ऋण आहे,मौज सारी त्याग तू...'(पृ.५७)

ही कविता वाचताना वामनदादांच्या 'भीमा तुझ्या मताचे जर पाच लोक असते...' ही कविता आठवल्याशिवाय राहात नाही. महामानव डॉ .आंबेडकरांच्या अगाध,अफाट परिश्रमांपुढे नतमस्तक होत 'युगंधर' या कवितेत त्या लिहितात की,

'ज्ञानाचा मार्ग तू आम्हा दावला
बुद्धाच्या धाग्यात धम्म ओवला
अन्यायाला वाचा मन फोडू लागले
हे बहुजन विहारी वळू लागले' (पृ.५८)

जातीयता आजही विसाव्या शतकात शिल्लक आहे उलट ती अधिक ठळक होऊ लागलेली दिसते .फक्त ती व्यक्त करण्याची पद्धत बदलली आहे हे सांगणारी कविता म्हणजे 'पद्धत'.

आयुष्यात आलेली क्रांती म्हणजे बाबासाहेबांनी हाती दिलेली 'लेखणी' याच कवितेतून त्या आपल्या मनात साचलेला विद्रोह व्यक्त करतात .'घंटा' या कवितेत

'पोतराजाच्या आसुडाप्रमाणे
घंटा हाती धरून
फोडून काढावी वाटते
आपणच आपल्याच देशातली
मनुवादी मानसिकता'(पृ.६८)

असा रोषही व्यक्त करते .स्वतःचेच दुःख कुरवाळताना समाजसाठीचे उत्तरदायित्व सोईने विसरणाऱ्या बांधवांना जाणीव करून देताना कवयित्री लिहिते की,

'शेवटी काय? विरून जाणे
शेवटी काय? मातीचे होणे
तोडून जा ना तुझे तू कुंपण
विसर जरा तू आपुले मी पण'(पृ.७१)

'गिधाडे '(पृ.८०) या कवितेतून ती जाणिवा हरवलेल्या स्वकीयांचेच शाब्दिक कान टोचते.

आपल्याच माणसांमध्ये पडलेले गट-तट कवयित्रीस व्यथित करतात, बेकीमुळे सत्ता हाती येत नाही, कुणीतरी आपला सत्तेसाठी वापर करून घेतं .बाबासाहेबांनी शासनकर्ती जमात होण्याचा जो मंत्र दिला होता त्याचा विसर पडलेल्या बांधवांसाठी त्या लिहितात,

'गटबाजीच्या दलदलीत रुतलं
तुमच्या रथाचं चाक आहे
अन्यथा...
तुमच्याशिवाय राज्य करायला ह्यांना कुठे नाक आहे?
अरे, अजूनही इथे
आंबेडकर नावाचाच धाक आहे
उठा, सावध व्हा गडयांनो
ही प्रकाशाची हाक आहे'

वर्षानुवर्षे ज्या विठ्ठलाला पूजता आलो त्यालाही आमची यातना कळू नये मग कशास हवी त्याची भक्ती?उलट त्यालाच आपल्या वाटेचा वाटसरू करू पाहणारी कवयित्री म्हणते,

'हात काढ तू कटीवरचे
नागभूमीची वाट चाल तू
आणि आमच्या बंडखोरीला
तु ही दे ना दाद विठ्ठला'(पृ.५६)

जसा संवेदनांचा दुष्काळ सद्या दिसतो तसा पाण्याचा दुष्काळही डोळ्यात पाणी आणतोय .'आळ' या कवितेत समग्र मानवजातीलाच जाब विचारत बळीराजाला धीर देताना कवयित्री लिहिते की,

'झाले डोईवर ओझे
त्याला चिंतेची चुंबळ
धीर सोडू नको धन्या
जरा स्वतःला सांभाळ
तुम्ही तोडले रे झाड
माझे फुटले कपाळ
सांगा कुणावर घेऊ
आता दुष्काळाचा आळ?'(पृ.५२)

'भाव' या कवितेतही

'रोज एक आत्महत्या
रोज नवं नाव आहे
बळीराजाच्या दुर्दशेला
साक्षी प्रत्येक गाव आहे'(पृ.५९)

ही शोकांतिका मांडतात.

'सुर्यकुलाची बेटी' असणारी कवयित्री 'निर्धार' या कवितेत आपली आंबेडकरी विचारधारेशी असणारी निष्ठा व्यक्त करताना लिहिते की,

'मी लिहीन स्वातंत्र्य, समता,बंधुतेवर
आणि
प्रज्ञा-शील-करूणेवर
मी लिहीन बाबा,लिहीत राहीन
तुझ्या लेखणीची शपथ
तुझ्या विचारांचा गाडा
नक्कीच रेटत पुढे जाईन'(पृ.९३(

जिथे जिथे विषमता, अन्याय दिसेल त्यावर लेखणीतून यल्गार देणारी कवयित्री स्वतः विविध प्रकारे विषमतेची बळी ठरतेय कधी लिंगभेदाची तर कधी जातीयतेची त्यामुळे कवयित्रीच्या कवितेतील भावना अधिक धारदार आहेत, त्यात एक आवेश आहे .परिवर्तनाची सक्षमता आहे.

'ती, कविता आणि चळवळ' हे अत्यंत चपखल असे शीर्षक या संग्रहास दिलेले आहे .या काव्यसंग्रहातील सर्वच कविता अत्यंत दर्जेदार ,वाचनीय आणि जीवनवादी आहेत. तरीही वाचक म्हणून, एक लिहिणारी चळवळीतील कार्यकर्ती म्हणून 'गावकुसाबाहेरच्या बाया' (पृ.६३) आणि 'निशाण'(पृ.९४) ह्या कविता मला खूप भावल्या .थेट माझ्या मेंदूतून काळजाला भिडणाऱ्या या कविता मागील वर्षी 'येवला मुक्तीभूमी' व्याख्यानमालेत कवयित्रीच्या आवाजात ऐकल्या आहेत. आवेशपूर्ण, विवेकी, अभ्यासू वक्ता म्हणूनही डॉ.विजयालक्ष्मी वानखेडे यांची ओळख महाराष्ट्राला आहेच .डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकादमी, बुलढाणा या संस्थेच्या त्या संस्थापक अध्यक्षा आहेत .शेवटी त्यांच्याच कवितेतून चळवळीत सोबत सक्रिय राहू, न्याय,समता, स्वातंत्र्य, धर्मनिरपेक्षतेचे निष्ठावान शिलेदार, वाहक होऊ .हे निशाण कधीच खाली ठेवणार नाही याची खात्री देत म्हणेन की,

‘समग्र शोषित वर्गास हेच सांगणे
'आता उठच तू,
झंजाळून उठ, झळाळून उठ
उठ, झेंड्याचा दांडा धर
आयानं म्हण की बयानं म्हण,
घ्यावंच लागेल हे निशाण
तुला तुझ्या खांद्यावर.'

**संदर्भ ग्रंथ : –**

१. ती ,कविता आणि चळवळ ,डॉ .विजयालक्ष्मी वानखेडे ,परिवर्तन प्रकाशन, बुलडाणा, २०१६
२. मराठी दलित कविता :एक चिकित्सक अभ्यास डॉ . सुनील चंदनशिवे , डिंपल प्रकाशन,मुंबई
३. दलित कविता व दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र, म.सू पाटील ,पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००९
४. दलित कविता आणि प्रतिमा, महेंद्र भवरे, लोकवाङमय गृह, मुंबई
५. दलित कवयित्रींची कविता: स्वरूप आणि चिकित्सा, डॉ.जया विश्वनाथ पाटील, पद्मगंधा प्रकाशन,पुणे